पुढारी, औरंगाबाद, सोमवार, २७ फेब्रुवारी २०१७.

# संपूर्ण सहकार क्षेत्राला दोष देणे चुकीचे

## ■ हरिभाऊ बागडे : बदनाम करण्याची मानसिकता बदलण्याची गरज



**औरंगाबाद : सहकार संगम परिषदेचे उद्घाटन करताना हरिभाऊ बागडे. या वेळी उपस्थित शेखर चरेगावकर, ओमप्रकाश कोयटे, संजय बिर्ला, किशोर शितोळे आदी.**

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात चांगले काम चालू आहे. मात्र, कुठेतरी एखादी दोन संस्थांमध्ये गैरव्यवहार झाला असल्यास संपूर्ण सहकार क्षेत्राला दोष दिला जात आहे. सहकाराला बदनाम करणारी ही चुकीची मानसिकता बदलली पाहिजे. असे प्रतिपादन राज्य विधानसभेचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी रविवारी येथे केले.

सहकार भारती आणि सहकार सुगंध यांच्यातर्फे संत तुकाराम नाट्यगृहात घेण्यात आलेल्या सहकार संगम परिषदेचे उद्घाटन बागडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष शेखर चरेगांवकर, राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश कोयटे, सहकार भारतीचे प्रदेशाध्यक्ष संजय बिर्ला, किशोर शितोळे, शांतीलाल शिंगी, दामूअण्णा नवपुते, संध्या कुलकर्णी, भालचंद्र कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. बागडे म्हणाले की, सहकारी संस्था चालविण्यासाठी प्रामाणिकपणाची मानसिकता संस्थाचालकांमध्ये आली पाहीजे. प्रामाणिकपणा असेल तर कोणालाही भिण्याची आवश्यकता नाही. सहकार क्षेत्र ताठ मानेने चालविले गेले पाहिजे. व्यवहार बुडालेल्या एखाद्या कर्जदाराकडून कर्ज वसूल करावयाचे असेल तर, त्याला पुन्हा थोडे कर्ज देऊन उभे केले पाहीजे. सहकार क्षेत्रासमोर अनेक अडचणी आहेत. मात्र, सूर्याला एखादा ढग जास्तवेळ थोपवू शकत नाही. तसे अडचणींवरही सहकार क्षेत्र मात करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तत्पूर्वी सायबर सुरक्षाया विषयावर अजय निकुंभ यांचे भाषण झाले. श्रीराम देशपांडे यांनी अर्थसंकल्पाचा सहकारी संस्थांवर होणारा परिणाम यावर भाष्य केले. पतसंस्था चळवळीसमोरील आव्हाने यावर ओमप्रकाश कोयटे यांचे भाषण झाले.

**तीस बँकांना पुरस्कार**

नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थांच्या उत्कृष्ट वार्षिक अहवालासाठी सहकार भारतीच्यावतीने स्पर्धा घेण्यात येते. विजेत्या तीस नागरी बँका आणि पतसंस्थांना बागडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.